2 7 JUL 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंत हवी नैतिकता, शिस्त, पारदर्शकता

## बाळ पाटणकर; राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेचे उद्‍घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : "युवक खेळाडूंमध्ये नैतिकता, शिस्त आणि पारदर्शकतेची भावना निर्माण होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आर. ए. तथा बाळ पाटणकर यांनी केले. राज्यस्तरीय दोन दिवसीय ॲथलेटिक्स कार्यशाळेच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते.

महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर



कोल्हापूर : येथील डीआरके कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेचे उद्‍घाटन आर. ए. तथा बाळ पाटणकर, डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते व राकेश सावे, शहाजी सूर्यवंशी, प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. शरद बनसोडे, सुभाष पवार, प्रकुल मांगोरे पाटील आदींच्या उपस्थितीत झाले.

जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनतर्फे ही कार्यशाळा आयोजित डीआरके कॉलेजमध्ये करण्यात आली आहे.

श्री. पाटणकर म्हणाले, "ॲथलेटिक्स क्षेत्रात येणाऱ्या तांत्रिक बदलाव, पंचांच्या भूमिकेतील जबाबदाऱ्या आणि डोपिंगसारख्या गंभीर समस्येवर उपाययोजना होणे आवश्यक बनले आहे. उच्च कामगिरीसाठी अवैध पद्धतीने अशा औषधे घेणे शरीराला घातक आहेत. याशिवाय करिअर संपण्याचा धोका अधिक आहे. त्यामुळे असे औषध घेण्यापेक्षा मेहनत अधिक घ्यावी. त्यातून उच्च दर्जाची पदक विजेते कामगिरी घडू शकते."

डॉ. मगदूम म्हणाले, "ॲथलेटिक्स सारख्या खेळांत आधुनिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्ये व पंचांच्या भूमिकेच्या सुसूत्रतेवर भर देण्याचे महत्त्व आहे. सतत बदलणाऱ्या जागतिक क्रीडा संस्कृतीशी समांतर जाण्यासाठी अशा कार्यशाळा अत्यावश्यक आहेत."

या दोन दिवस चालणाऱ्या कार्यशाळेत पहिल्या दिवशी ॲथलेटिक्समधील तांत्रिक नवकल्पना, पंचांची जबाबदारी, खेळातील नैतिक मूल्यांवर सखोल चर्चा झाली. यात आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार, राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनचे तांत्रिक समितीचे चेअरमन राकेश सावे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. असोसिएशनचे अध्यक्ष शहाजी सूर्यवंशी यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. सचिव प्रा. प्रकुल पाटील मांगोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यावेळी डीआरके कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, असोसिएशनचे खजिनदार आर. डी. पाटील, आर. व्ही. शेटगे, कृष्णात लाड, उपप्राचार्य डॉ. आर. एस. नाईक उपस्थित होते. कार्यशाळेसाठी अमोल आळवेकर, नवनाथ पूजारी, अश्विनी पाटील मांगोरे, रोहन माने, महेश मांगले, सौरभ बावडेकर यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 JUL 2025
लोकमत

# डोपिंग क्रीडा क्षेत्राला धोकादायक : पाटणक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देश आणि राज्यपातळीवरील विविध स्पर्धात डोपिंगचा प्रकार वाढत चालला आहे. हा प्रकार क्रीडा क्षेत्राला धोकादायक ठरत आहे. त्याला वेळीच थांबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष, उद्योगपती बाळ पाटणकर यांनी केले.

महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्यातर्फे राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेचे शनिवारी कॉमर्स कॉलेज येथे उद्घाटन झाले. जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनतर्फे संयोजन करत असून, कार्यशाळेत राज्यातील ७५ खेळाडू, प्रशिक्षक, पंच सहभागी झाले.

पाटणकर यांनी ॲथलेटिक्स पंचांच्या कार्यक्षेत्रात होत असलेले बदल, नवीन नियम-अटी व डोपिंगच्या धोक्यांची माहिती सांगितली.



कोल्हापूर येथील कॉमर्स कॉलेजमध्ये शनिवारी राज्यस्तरीय ॲथलेटिक्स कार्यशाळेचे उद्घाटन उद्योगपती बाळ पाटणकर, डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते झाले. या वेळी प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, ड आर. एस. नाईक, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

तसेच तांत्रिक नवकल्पना, पंचांची जबाबदारी, खेळातील नैतिक मूल्यांवर चर्चा झाली.

या वेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव आणि अध्यक्ष डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, उपप्राचार्य डॉ. आर. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, असोसिएशनचे तांत्रिक समितीचे अध्यक्ष राकेश सावे, आंतरराष्ट्रीय ॲथलेटि प्रशिक्षक सुभाष पवार, आर. डी. पाटी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आर. व्ही. शे सदस्य कृष्णात लाड उपस्थित ह असोसिएशनचे अध्यक्ष शहाजी सूर्यवंशी य प्रास्ताविक केले. सचिव प्रकुल पाटील-मा यांनी परिचय करून दिला. प्रा. नवनाथ पुज यांनी सूत्रसंचालन केले.

27 JUL 2025 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या खानापूर उपकेंद्रासाठी जागेची पाहणी

लोकसत्ता प्रतिनिधी



शिवाजी विद्यापीठाचे खानापूर उपकेंद्र सुरू करण्यासाठी समितीने जागेची पाहणी केली.

**सांगली :** शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूरमध्ये सुरू करण्यासाठी समितीकडून जागेची पाहणी करण्यात आली असून चालू शैक्षणिक वर्षापासून हे उपकेंद्र सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती विट्याचे माजी नगराध्यक्ष अॅड. वैभव पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्यातील दुष्काळी भागात शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू व्हावे म्हणून गेले कित्येक दिवस प्रयत्न सुरू होते. या प्रयत्नांना आता यश आलेले पाहण्यास मिळत आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्राचे कामकाज सुरू करण्याविषयी प्रशासकीय स्तरावरून हालचाली गतिमान होत आहेत. त्यातीलच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या समितीने या उपकेंद्राचा कारभार येत्या काही दिवसांतच सुरू करण्यासाठी इमारतींची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, समिती सदस्य अॅड. पाटील, सदस्या प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी, प्रा. डॉ. रघुनाथ ढमकले, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परूळेकर यांच्यासह शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. निवासराव वरेकर व पदाधिकारी यांनी खानापूर शहरातील चार ठिकाणच्या जागेसंबंधी प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध असणाऱ्या इमारतीची पाहणी केली. यामध्ये संपतराव माने महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था संचलित ज्युनिअर कनिष्ठ महाविद्यालय, शोभादेवी पवार कनिष्ठ महाविद्यालय व अपेयस पब्लिक स्कूल या चारही ठिकाणी समितीने भेट देत त्या ठिकाणी असलेल्या इमारतीची व उपलब्ध सुख सुविधेची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणी भेटीचा अहवाल समितीकडून विद्यापीठात सादर करून विद्यार्थी पालक तसेच प्रशासन यांना सोयीस्कर असलेल्या इमारतीची निवड केली जाणार आहे. यानंतर चालू शैक्षणिक वर्षात म्हणजेच जुलैअखेर शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र या ठिकाणी सुरू होईल, अशी ग्वाही समितीने दिल्याची माहिती अॅड. पाटील यांनी दिली.

2 7 JUL 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे प्रा. राजमल जैन यांच्या विशेष व्याख्यानांचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोल भौतिकशास्त्रज्ञ व रॉयल अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटी, यूकेचे फेलो प्रा. राजमल जैन यांच्या विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. 'इंडियन इन टू स्पेस' या महत्त्वपूर्ण विषयावर ते अर्जुननगर, कोल्हापूर, सांगली व जयसिंगपूर येथील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये मार्गदर्शन करतील. दि. २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता देवचंद कॉलेज, अर्जुननगर; दि. २९ रोजी दुपारी ३ वाजता पदार्थविज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दि. ३० रोजी सकाळी ११ वाजता श्रीमती कस्तुरबाई वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सांगली तर दि. ३१ रोजी सकाळी ११ वाजता, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे व्याख्यान होणार आहेत, अशी माहिती डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUL 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठातर्फे प्रा. राजमल जैन यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रातर्फे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोल भौतिकशास्त्रज्ञ आणि रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी, यूकेचे फेलो प्रा. राजमल जैन यांच्या विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. 'इंडियन इन टू स्पेस' या महत्त्वपूर्ण विषयावर ते अर्जुननगर, कोल्हापूर, सांगली आणि जयसिंगपूर येथील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये मार्गदर्शन करतील. यामध्ये दि. २८ रोजी सकाळी ११ वाजता देवचंद कॉलेज, अर्जुननगर, २९ रोजी दुपारी ३ वाजता पदार्थ विज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, ३० रोजी सकाळी ११ वाजता कस्तुरबाई वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सांगली तर ३१ रोजी सकाळी ११ वाजता, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे व्याख्याने होणार आहेत, याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे, समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 JUL 2025
सकाळ

# चिकित्सक वृत्तीसाठी आविष्कार कार्यशाळा गरजेची

## डॉ. टी. एम. चौगले; भोगावती महाविद्यालयातील कार्यशाळेत तीनशे संशोधक सहभागी

■ सकाळ वृत्तसेवा

शाहूनगर, ता. २६ : विद्यार्थ्यांच्यात गुणवत्तेबरोबरच सुप्त व चिकित्सक वृत्ती विकसित करण्यासाठी आविष्कार संशोधन स्पर्धा महत्त्वाचे कार्य करीत आहे. याविषयीची संपूर्ण माहिती संशोधकाला होण्यासाठी माहिती कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले.



कुरुकली: येथे आविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळेचे रोपट्याला पाणी घालून उद्घाटन करताना डॉ. टी. एम.चौगले, सोबत दिगंबर मेडसिंगे, मोहन पाटील, डॉ. डी. ए. चौगले, राजेंद्र आडके, डॉ. सुनील खराडे.

कुरुकली (ता. करवीर) येथे शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि भोगावती महाविद्यालयातर्फे झालेल्या जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भोगावती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष दिगंबर मेडसिंगे होते. कार्यशाळेत तीनशे संशोधकांनी सहभाग घेतला. उपाध्यक्ष मोहन पाटील यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ.डी.ए.चौगले यांनी प्रास्ताविक केले.

समन्वयक प्रा. वंदना पाटील यांनी परिचय करून दिला. कार्यशाळेत डॉ. आर. एच.अतिग्रे, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. जे. के. पवार, डॉ. एस. डी.जाधव, डॉ. एम. ए. कांबळे, डॉ. के. व्ही. मारुळकर, डॉ. ए. पी. कांबळे, डॉ. एम. बी. थोरात, डॉ. श्रीमती के. एस. वडाळे, डॉ. आर. के. वाकरेकर, डॉ. आर. एस. कांबळे, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. व्ही. पी. कोठावळे, डॉ. डी. के. दळवी, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. डी. आर. चांदम, डॉ. एस. एस. भोसले, प्रा. आर. एस. भोसले, डॉ. यू. एच. पाटील, डॉ. टी. डी. डोंगळे, प्रा. एस. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. उपाध्यक्ष मोहन पाटील, राजेंद्र आडके, बाजीराव चौगले, उपप्राचार्य डॉ. निवास पाटील, डॉ. सुनील खराडे, डॉ. डी. एल. कांबळे, डॉ. संजय साळोखे, प्रा. अनिल पाटील उपस्थित होते. डॉ. एन. एम. पाटील यांनी आभार मानले. प्रा. पवन पाटील यांनी सूत्रसंचालन केले.